गॅरेजची/शेडस्ची विक्री व्यवस्था करणेसाठी आवश्यक त्या सर्व वा काही वा मोजक्या गोष्टी तरतुदी/बाबी करण्याचा अधिकार देणे.

(१५) नियोजित डी.पी. रोडमधील क्षेत्र नागपूर म.न.पा./नगर रचना कडे ताब्यात देणे, त्याचा एफ.एस.आय किंवा टी.डी. आर. घेणे व त्याचा विनीयोग करणे इतर दुस–या ठिकाणी उपलब्ध असणारा टी.डी. आर. तेथून घेऊन सदर मिळकतीवरील इमारतीसाठी वापरणे, खर्च करणे आणि त्याचा फायदा वा उत्पन्न स्वत:साठी स्वत:च्या मर्जीप्रमाणे वापरणे.

(१६) मी उपरोलिखित आममुखत्यापत्र लिहून ठेवणार कबूल करतो व जाहीर करतो की माझे आममुखत्यारपत्र गुडधे हाऊसिंग डेव्हलपर्स ॲन्ड प्रमोटर्स, तर्फे भागिदार श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे, यांनी अथवा त्याचे प्रतिनिधी वा नोकर अथवा त्यांचे पोटमुखत्यार यांनी केलेल्या सर्व कायदेशीर कृती, वा गोष्टी वा बाबी या कामी मी स्वत:च त्या केल्याप्रमाणे माझेवर बंधनकारक राहतील. मी अशी खात्री देतो की सदरचे आममुखत्यारपत्र कधीही रद्द न करण्याजोगे आममुखत्यारपत्रान्वये केलेल्या सर्व कायदेशीर कृती, गोष्टी वा बाबी यांनी माझी सदैव आणि निरंतर उत्तरमान्यता राहील. सदरचे आममुखत्यारपत्र हे माझे व्यक्तीश:वालीवारस, हक्कदार, नॉमिनीज, ॲडमिनीस्ट्रेटर्स वा एक्झीक्युटर्स यांवर बंधनकारक राहील. मात्र उभयपक्षी हे असे स्पष्टपणे कबूल केले आहे की या आममुखत्यारपत्राची अंमलबजावणी करताना वा त्यामुळे कोणतीही आर्थिक जबाबदारी उद्भवेल किंवा कायदेशीर कोर्ट दरबार कारवाई वगैरे होईल त्यांची सर्व जबाबदारी आममुखत्यार–लिहून घेणार यावर राहील व त्याची तोषिस मी लिहून देणार यास लागणार नाही.

करिता हा कायमस्वरूपाचे आममुखत्यार पत्र मान्य व कायम करण्याचा लेख पक्ष क्र. १ व पक्ष क्र. २ यांनी संपूर्ण विचारांती खालील साक्षीदारासमक्ष निष्पादीत केला असून त्यावर नमूद केलेल्या दिवशी सहया केल्या आहेत व हा लेख दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहील.

साक्षदार :–

(१) .....

सौ. कल्पना अ. ठाकरे
(सौ. कल्पना अशोकराव ठाकरे)
लिहून देणार/पक्ष क्र. १

(२) .....

गुडधे हाऊसिंग डेव्हलपर्स ॲन्ड प्रमोटर्स

(श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे)
भागिदार
लिहून घेणार/पक्ष क्र. २

नगन - २
१२५९ | २०१०
५ | २१

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

ONE HUNDRED RUPEES

रु. 100

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

Z 129601

N. V. Pokuta.
Stamp Vendor
Coll. OTI NAGPUR
Rev. Case. No. 133-B
(102/74/75 Dt. 21/5/1975)

Sr No .....Rs .... Dt ..

Name .....

बयान - २

१२५९	२०१०
९	२१

कायमस्वरुपाचे आममुखत्यारपत्र

सदरचे कधीही रद्द न करण्याजोगे आममुखत्यारपत्र मुक्काम नागपूर येथे दिनांक 03... एप्रिल २००७ रोजी लिहून दिले असे ते येणेप्रमाणे –

लिहून देणार (जमिनमालक)

सौ. कल्पना अशोकराव ठाकरे वय – 45... वर्षे, व्यवसाय – घरकाम, राहणार – अमरावती, तहसिल व जिल्हा – अमरावती

(ज्यास या करारात पक्ष नं. १ म्हणूनही संबोधिले आहे आणि त्यामध्ये त्याचे वालीवारस, हक्कदार, हस्तांकिनी, नॉमिनीज, एक्झेक्युटर्स आणि ॲडमिनीस्ट्रेटर्स यांचाही समावेश होतो.)

IMPOUNDED
U/s. 33 of B. S. Act, 1958

Collector of Stamps
Nagpur City
Dt. 19/3/10

Certificate u/s 41 of the B. S. Act 1958 (EVN)

EVN Case No. 849/09-10

Market Value

Rs. 47,00,000/-

Office of the
Collector of Stamps
Nagpur City
Dated 19/3/10

Received From Gulshan Housing & Developers and promoters through Partner Prafull V. Undhade R/o Nagpur

Resident at

Insufficient stamp duty of Rs. 4,70,900/- chargable under Article 4.8 (b) of the Bombay stamp Act 1958 and penalty of Rs. 3,39,059/- u/s 39 of B.S. Act 1958 vide challan No. 26/12 Dated 25/3/10 Certified under section 41 of the B. S. Act 1958 that the proper duty have been paid in respect of this instrument.

This certificate is subject to the provisions of section 53A of the Bombay stamp Act 1958.

Nagpur
Date 26/3/10

Collector of Stamps
Nagpur City

Jt. Dist. Registrar CL-I & Collector of Stamps NAGPUR CITY

नगाव - २
९२५९ | २०९०
७ | २१

लिहून घेणार (विकासक)

गुडधे हाऊसिंग डेव्हलपर्स अॅन्ड प्रमोटर्स, भागीदारी संस्था ज्याचे कार्यालय नागपूर तर्फे भागिदार श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे, वय ३१ वर्षे, धंदा – व्यापार, राहणार – जयताळा, नागपूर तहसिल व जिल्हा – नागपूर

(ज्यास या करारात पक्ष नं. २ म्हणूनही संबोधिले आहे आणि त्यामध्ये त्याचे वालीवारस, हक्कदार, हस्तांकिनी, नॉमिनीज, एक्झेक्युटर्स आणि अॅडमिनीस्ट्रेटर्स यांचाही समावेश होतो.)

१) मिळकतीचे वर्णन :

(१)

मौजा – जयताळा, प. ह. नं. ४४, तहसिल व जिल्हा – नागपूर, येथील शेत सर्व्हे नं. १३२ आराजी १.३६ हे.आर, शेतसारा रु. ५.५० भो. वर्ग १ सिटी सर्व्हे क्र. ७६१, शिट क्र. ५८३/५३ ही जमीन तसेच त्यावरील तृण, काष्ट, पाषाण, झाडझुडपे व इतर सर्व मालकी अधिकारांसह जमीन व याची चतु:सिमा खालीलप्रमाणे :–

पुर्वेस	–	खसरा क्र. १२८/१
पश्चिमेस	–	खसरा क्र. १३३
उत्तरेस	–	खसरा क्र. १०९–११४/१,२
दक्षिणेस	–	खसरा क्र. १३१

(२)

मौजा – जयताळा, प. ह. नं. ४४, तहसिल व जिल्हा – नागपूर,येथील शेत सर्व्हे नं. ११९–१२१/१ व १२०/१ आराजी २.०३ हे. आर व ०.०७ हे. आर. शेतसारा रु. १३.०० व रु. ०.५० प्रत्येकी भो. वर्ग १ सिटी सर्व्हे क्र. ६४०, शिट क्र. ५७२/४४ या जमीनीपैकी १.६० हे. आर जमिन तसेच त्यावरील तृण, काष्ट, पाषाण, झाडझुडपे व इतर सर्व मालकी अधिकारांसह जमीन व याची चतु:सिमा खालीलप्रमाणे :–

पुर्वेस	–	सौ. शेषावंती गंगारामजी राऊत यांचा याच खस–यामधील हिस्सा
पश्चिमेस	–	श्री. सुधाकर नथ्थुजी गुडधे व इतर भाऊ यांच्या मालकिचा याच खस–यामधील हिस्सा
उत्तरेस	–	रस्ता व पलिकडे खसरा क्र. १००
दक्षिणेस	–	खसरा क्र. १२२

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत.

कारणे कधीही रद्द न करण्याजोगे आममुखत्यारपत्र लिहून देण्यात येते ते येणेप्रमाणे –

नागपूर - २
9241/2010
L/29

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत लिहून देणार यांची मालकी वहीवाटीची आहे व तिचा ते प्रत्यक्ष ताबेकब्जाने निरंतर उपभोग घेत आहेत. लिहून देणार यास मिळकतीचा योग्य आणि गतीमान विकसनासाठी त्याचेतर्फे आणि त्याचेकरीता विविध कामे, बाबी, गोष्टी वा कृती करण्यासाठी आममुखत्यारपत्र नेमणे जरुरीचे वाटते आहे. त्याअर्थी पक्ष नं. २ हे पक्ष नं. १ म्हणजेच गुडधे हाऊसिंग डेव्हलपर्स अॅन्ड प्रमोटर्स, तर्फे भागिदार श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे, यांना स्वतंत्रपणे माझे वतीने खालीलपैकी कोणेतीही कृती कामे, गोष्टी वा बाबी स्वतंत्रपणे करण्यासाठी माझे आममुखत्यारपत्र म्हणून नेमीत आहे आणि त्यास अधिकार प्रदान करीत आहे ते येणेप्रमाणे.

३) माझ्या वतीने आर्किटेक्ट, इंजीनियर वा परवानाधारक सर्वेअर नेमुन वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये प्लॉटचे ले–आऊट तयार करुन घेणे, ले–आऊट प्लॉट पाडणे, आणि सदरहू ले–आऊट, नकाशा व योजना योग्य त्या म.न.पा./ग्रामपंचायत/नगर रचना यांचे अधिका–यांकडे मंजुरीसाठी सादर करणे आणि त्याकामी तशा अधिका–यांसमोर काम दाखविण्यासाठी प्रत्यक्ष वा अधिकृत व्यक्ती मार्फत हजर राहणे आणि सदरहू अधिकारी याने सूचित केल्याप्रमाणे मान्य असलेले आवश्यक ते फेरबदल/दुरुस्ती/सुधारणा वगैरे सदरील ले–आऊट नकाशा व योजना यामध्ये घडविणे. तसेच मंजूर ले–आऊट मधील प्लॉटस्वर बांधकाम करण्याकरीता बांधकाम नकाशे तयार करणे व योग्य त्या अधिका–यांकडून मंजूरी घेणे आणि बांधकाम झाल्यानंतर नागपूर सुधार प्रन्यास/म.न.पा./ग्रामपंचायत मिळकत कर आकारणीचे कामी हजर राहणे, कागदपत्रे दाखल करणे, जबाब देणे आणि मिळकत कर निश्चित करुन घेणे.

४) नागरी कमाल जमिनधारणा, सक्षम अधिकारी नागपूर विभाग, नागपूर यांचेसमोर सदरहू जमीनीचे संबंधी विवरणपत्र दाखल करणे, व योग्य ते आदेश/परवानगी बाबत व हस्तांतरणाचे कामी प्रतिनिधित्व करणे, हजर राहणे वा काम चालविणे.

६) जिल्हाधिकारी नागपूर यांचेसमोर अथवा त्यांनी गठीत केलेल्या सक्षम अधिका–या समोर मिळकतीचे संदर्भात अकृषक परवाना वगैरेसाठी जरुरीप्रमाणे माझे वतीने अर्ज करणे, प्रतिनिधीत्व करणे व काम चालविणे, तसेच अकृषीक परवानगी आदेश प्राप्त करणे.

७) माझ्या वतीने सदरहू जमिनीवर तयार केलेल्या ले–आऊटपैकी भुखंड, सदहुं जमीन माझ्या वतीने खाजगी संस्था, गृहतारण संस्था, सरकारी व निमसरकारी किंवा राष्ट्रीयकृत व इतर बँकेत गहाण ठेवणे, त्यावर कर्ज काढणे व त्याची परतफेड करण्याचे अधिकार देत आहेत.

८) नियोजित ले–आऊट मधील प्लॉटस् वा इमारतीतील फ्लॅट, दुकाने, सदनिका, बंगले, पार्किंग जागा/तळमजला/गॅरेज वगैरे आणि त्याप्रमाणे सदरहू मिळकत आममुखत्यार यांस वाटेल त्याप्रमाणे कोणासही निरनिराळया प्रकारे वेळी विकणे, विल्हेवाट लावणे, हस्तांतरीत करणे, सुपूर्त करणे अथवा नामनिर्देश करणे अथवा इतर कोणत्याही मार्गाने कायदेशीर विभक्त करणे व त्यासाठी करारनामे करणे, पैसे स्वीकारणे, पावत्या देणे, घेणे करारनामा रजिस्टर करणे, त्यांना ताबे देणे व माझ्या वतीने दस्त नोंदणीसाठी अंमलात आणणे.

९) जरुरीप्रमाणे दरेकवेळी एक वा अनेक अॅडव्होकेट/वकील मिळकतीचे संदर्भातील कोणत्याही बाबतीत नेमणे.

सह दु.नि. - २
१२५१/२०१०
९/२१

१०) इमारत बांधकामाचे व ले–आऊट प्लॉटस मिळकतीचे संदर्भात कोणीही ति–हाईत/इच्छुक व्यक्ती/संस्था वगैरेचे बाबतीत कोणत्याही दिवाणी वा फौजदारी न्यायालयात वा न्यायाधिकारणात दावा/अर्ज/खटला/दावा दाखल करणे, चालविणे अथवा दाखल कामी प्रतिवादी/जाब देणार म्हणून रक्षण करणे अथवा तडजोड करणे वा दावा कढून घेणे आणि अश्या सर्व दिवाणी वा फौजदारी दाव्यासंबंधी आवश्यक त्या सर्व गोष्टी करणे.

११) ले–आऊट प्लॉटस वा इमारत बांधकाम करणेचे संदर्भात/तिची विक्री हस्तांतरण वगैरे बाबतीत योग्य त्या समक्ष वा प्रधिकृत अधिका–याकडून मंजूरी/संमती ना हरकत मिळविण्यासाठी आवश्यक व जरुरी अशा सर्व कृति/बाबी करणे अथवा भुखंडाचे विभाजन करणे वा घडवून आणणे.

१२) सदर संपूर्ण जमीन अथवा ले–आऊट प्लॉटस वा गाळे/बंगले/दुकाने/गॅरेज यांचे विक्री/हस्तांतरण कोणत्याही व्यक्तीस करणेच उद्देशाने आममुखत्यार यांस योग्य वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही दस्तावर वा कागदपत्रांवर आमचे वतीने सही करणे व ते अंमलात आणणे वा वचने/आश्वासने देणे जेणेकरुन त्या दस्तान्वये मिळकतीचे पूर्ण व परिणामकारक हस्तांतरण आम्ही स्वत:च केलेप्रमाणे होईल आणि माझे वतीने व माझेसाठी पावती लिहून दाखल करणे.

१३) दुय्यम निंबधक, नागपूर यांचेसमोर खरेदीखते वा इतर दस्त माझ्या वतीने नोंदणीसाठी हजर करणे, तशा दस्तांवर माझे वतीने सही करणे व ती अंमलात आणणे.

१४) स्थानिक अधिकारी, राज्य सरकारी अधिकारी, केंद्र सरकारी अधिकारी वा निमसरकारी अधिकारी यांचे समोर कलम १ मधील मिळकत वा प्लॉटस व इमारत बांधकाम यांचे संदर्भात आवश्यक त्या कोणत्याही परवानग्या अथवा मंजूरी प्राप्त करुन घेणेसाठी माझे वतीने प्रतिनिधीत्व करणे, जबाब देणे, कागदपत्रे दाखल करणे वगैरे.

१५) नियोजित ले–आऊट प्लॉटस् वा इमारतीत फ्लॅट/दुकाने/बंगले/गॅरेज वगैरे इच्छुक ग्राहकांची जी सहकारी संस्था/मर्यादित कंपनी/अपार्टमेंटधारकांचे मंडळ स्थापन केले जाईल तिमध्ये जागा मालक म्हणून माझे प्रतिनिधीत्व करणे आणि त्या संदर्भात आवश्यक त्या समक्ष अधिका–याकडे माझे वतीने जरुरी अर्ज, प्रतिज्ञालेख, जाबजबाब, कबूली लेख लिहून दाखल करणे.

१६) आममुखत्यारपत्रात नमूद केलेल्या सर्व हक्क व अधिकारास पात्र राहून त्या अनुषंगाने पर्यायी मुखत्यार नेमणे वा स्वतंत्रपणाने पोटमुखत्यार पत्र दुस–यांस लिहून देणे व तशा पोटमुखत्यारास वा व्यक्तीस मर्जीने आममुखत्यार पत्रातील सर्व वा काही अधिकार प्रदान करणे वा त्याप्रमाणे तशा पर्यायी व्यक्तीस वा पोट मुखत्यारास नियोजित इमारत बांधकाम योजना यशस्वी रितीने पूर्ण करण्यासाठी व ले–आऊट फ्लॅटस/गाळयांची/बंगल्यांची/दुकानांची/गॅरेजची/शेडसची विकी व्यवस्था करणेसाठी आवश्यक त्या सर्व वा काही वा मोजक्या गोष्टी तरतुदी/बाबी करण्याचा अधिकार देणे.

१७) नियोजित डी.पी. रोडमधील क्षेत्र नागपूर म.न.पा./नगर रचना कडे ताब्यात देणे, त्याचा एफ.एस.आय किंवा टी.डी. आर. घेणे व त्याचा विनियोग करणे तसेच दुस–या ठिकाणी असलेल्या असलेला टी.डी. आर. तेथून घेऊन येथे [illegible]